# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ३०/०७/२०२४ (मंगळवार) सकाळ


### नागपूर ग्रामीण हद्दीत सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

पोस्टे मौदा येथील स्टाफ पोस्टे हद्दीत महालगाव परीसरात पेट्रोलींग व जुगार रेडकामी फिरत असताना मुखबिरद्वारे माहिती मिळाली की, सावळी फाटा नागपूर ते भंडारा रोड जवळील झोपडीमध्ये काही इसम सट्टापट्टीचे बोगस आकडयावर लोकांकडून पैसे व नंबरचा चिट्ठया स्विकारून हारजितचा जुगार खेळ खेळत आहे. अशा माहिती वरून रेड केली असता **आरोपी नामे– जयंत राजेश राउत वय २२ वर्ष, रा. महालगाव मौदा** यांची झडती घेतली असता त्यांचे ताब्यातून नगदी ४७०/–रू. दोन कागदी पट्टी पिवळया रंगाची ज्यावर सट्टापटटीचे आकडे लिहलेली, एक निळया रंगाचा पेन कि. ०५ रू. एकुण ४७५/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करून सदर आरोपीस सट्टीपट्टीबाबत विचारणा केली असता आरोपी **माधव शंकर मते वय ३८ वर्ष, रा. कळमना मार्केट चिखली वार्ड १०३ नागपुर** याचे सांगण्यावरून सट्टापट्टी लिहण्याचे काम करीत असल्याचे सांगितले. आरोपीतांविरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम सहकलम ४९ बी एन एस अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तसेच पोस्टे मौदा येथील स्टाफ पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, बस स्टॉप मौदा लगत असलेल्या भिवगडे फ्रुट सेंटर जवळ सार्वजनिक ठिकाणी एक इसम हा आपल्या जवळील कागदी पट्टीवर सट्टीपट्टीचे आकडे लिहुन लोकांकडुन पैसे घेवुन त्यावर पैशाची बाजी लावुन हारजितचा जुगार खेळवत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून नमुद घटनास्थळी जावुन रेड कारवाई केली असता **आरोपी नामे– १) स्वप्नील रूपराव कुंभलकर वय २९ वर्ष रा. शारदा चौक मौदा** याची अंगझडती घेतली असता त्याचे ताब्यातून नगदी ५९०/–रू. एक कागदी पट्टी पिवळया रंगाची ज्यावर सट्टापटटीचे आकडे लिहलेली एक निळया रंगाचा कागद एकुण ५९०/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करून सदर आरोपीस सट्टीपट्टीबाबत विचारणा केली असता आरोपी **२) ज्ञानेश्वर उर्फ नाना चुडामण नाकाडे, रा. शारदा चौक मौदा** याचे सांगण्यावरून ४००/–रू. रोजी प्रमाणे त्याचेसाठी सट्टापट्टी लिहण्याचे काम करीत असल्याचे सांगितले. आरोपीतांविरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम सहकलम ४९ बी एन एस अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर